# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**ठाणे जिल्हा परिषदेतील राखीव पदे भरण्याबाबत**

**(१) ४१६१ (२२-१२-२०१४). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा परिषदेमध्ये बिंदुनियमावलीनुसार राखीव पदे भरणे बंधनकारक असतानाही ठाणे जिल्हा परिषदेने नियम डावलून आरक्षणात गैरप्रकार करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणातील दोषींवर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०२-२०१५) :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मिरज तालुक्यातील जास्त लोकसंखा असणाऱ्या गावांना जास्त निधी देण्याबाबत**

**(२) ४४७४ (२२-१२-२०१४). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासन ग्रामपंचायत जनसुविधा योजनेंअंतर्गत प्रत्येक समाजास स्मशानभूमी, दफनभूमी, वॉल कंपाऊड, सरकता दरवाजा, ग्रामसचिवालय बांधणे आदी कामासाठी एका गावात जास्ती-जास्त १० लाखाच निधी देतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी मिरज तालुक्यातील मौजे बेडग, आरग, म्हैसाळ, नरवाड, लिंगनुर, मालगांव, खंडेराजूरी, कवलापूर, सोनी, भोसे या मोठ्या गावामध्ये प्रत्येक समाजाचे लोक राहतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने शासन निर्णय बदलून ज्या गावाची लोकसंख्या जास्त आहे अशा गावाना निधी जास्त देणेबाबत कोणता निर्णय घेणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०३-२०१५) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) गावाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निधी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

---

## रायपाटण (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) ग्रामपंचायत क्षेत्रातील अतिक्रमण निष्कासीत करण्याबाबत

**(३) ४५२५ (२२-१२-२०१४). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायपाटण (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) ग्रामपंचायत क्षेत्रातील भूमापन क्र.३६-अ-१, हिस्सा क्र.२० वरील अतिक्रमण त्वरीत निष्कासीत करण्याबाबतचे निवेदन स्थानिक ग्रामस्थ श्री.श्रीकांत रा.कोलते यांनी शासनाकडे सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू अनिधकृत बांधकाम निष्कासीत करण्याबाबत ग्रामपंचायत-रायपाटण यांचेकडून मुंबई ग्रामपंचायत (अडथळा आणि अतिक्रमण काढणे) नियम १९७१ अन्वये आजपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले आहे आणि सदरहू अनधिकृत बांधकाम निष्कासीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही करण्यात केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०२-२०१५) :** (१) होय.
(२), (३) व (४) रायपाटण ग्रामपंचायत क्षेत्रातील भूमापन क्र.३६-अ-१, हिस्सा क्र.२० मधील सह हिस्सेदार श्री. राजाराम तुकाराम कोलते यांनी ग्रामपंचायतीकडे सादर केलेला ७/१२ उतारा, स्थळ दर्शक नकाशा, सहायक अधिक्षक जिल्हा न्यायालय रत्नागिरी यांचेकडील जागे संबंधिचे कच्चे वाटप पत्र व हमीपत्र इ. कागदपत्रांच्या आधारे ग्रामपंचायत रायपाटण यांनी मासिक सभा दि. २६.०९.२०१३, ठराव क्र. ६(६) अन्वये ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ५२ नुसार अटी व नियम यांना अधीन राहून श्री. राजाराम तुकाराम कोलते यांना रायपाटण ग्रामपंचायत क्षेत्रातील भूमापन क्र. ३६-अ-१, हिस्सा क्र. २० मध्ये घर बांधकामास परवानगी दिली आहे.

वरील मिळकतीच्या वाटपाबाबत मे.दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) राजापूर यांचेकडे दाखल करण्यात आलेल्या रेग्युलर दिवाणी दरखास्त नं. २३/२०१२ मध्ये दि. २२ ऑक्टोबर, २०१२ च्या आदेशान्वये सदर मिळकतीच्या वाटपाकरीता जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना आयुक्त म्हणून नेमण्यात आले आहे. सदर प्रकरणी अंतिम वाटपासंदर्भात कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कन्नड-सोयगांव (जि.औरंगाबाद) विधानसभा मतदार संघातील धरणांना मंजूरी दिली नसतानाही धरणाच्या कामांना पाणी उपलब्धता प्रमाणपत्र दिल्याबाबत**

**(४) ४६०२ (२३-१२-२०१४). श्री.हर्षवर्धन जाधव (कन्नड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कन्नड-सोयगांव (जि.औरंगाबाद) विधानसभा मतदार संघातील गुजरदरी, कोठी राजूखोटा, सिताखोटी इत्यादी धरणांच्या कामांना पाणी उपलब्धता प्रमाणपत्र दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच उक्त धरणांना अद्याप मंजूरी देण्यात आलेली नाही हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-०२-२०१५) :**(१) होय.
(२) होय.
(३) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ कलम ११ (फ) नुसार प्रस्तावित प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देणेपुर्वी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणची मान्यता (Clearance) मिळणे आवश्यक आहे. उक्त प्रकल्पांना सदर वैधानिक मान्यता अद्यापी मिळालेली नाही.

---

**राज्यातील ग्रामपंचायतींना लोकसंख्या व उत्पन्नानुसार अनुदान मिळण्यासाठी असलेल्या अटी शिथील करण्याबाबत**

**(५) ४६७२ (२२-१२-२०१४). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामपंचायतींना लोकसंख्या व उत्पन्नानुसार अनुदान देण्याचा निर्णय राज्य शासनाने माहे एप्रिल, २०१४ पासून लागू केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हे अनुदान मिळण्यासाठी ९० टक्के कर वसुलीची अट घालण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ही अट शिथील करुन ग्रामपंचायतींना व ग्रामपंचायत कर्मचा-यांना अनुदान देण्यात यावे अशी मागणी ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०२-२०१५) :**(१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) ग्रामपंचायत कर्मचा-यांचे किमान वेतन महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ६१ अन्वये ग्रामनिधीतून देणे अशी तरतूद आहे. परंतु ग्रामपंचायतीचे उत्पन्न कमी असल्याने याबाबत शासनाकडून अनुदान देण्यात येते. गावातील घरपट्टी, पाणीपट्टी हे ग्रामपंचायतीचे उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत आहे. गावातील घरपट्टी व पाणीपट्टी वसुल करणे ही जबाबदारी ग्रामपंचायत कर्मचारी यांची आहे. तसेच हा त्यांच्या कर्तव्याचा भाग आहे. घरपट्टी व पाणीपट्टी जास्तीत जास्त वसुल केल्यास ग्रामपंचायतीचे उत्पन्न वाढवून ग्रामपंचायतीचे कामकाज सुरळीत चालू राहील. त्यामुळे करवसुलीची अट शिथील करणे योग्य नाही.

ग्रामसेवक हे ग्रामपंचात करवसुलीचे काम फक्त ग्रामपंचायत कर्मचा-यांवरच सोपवत असल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे शासन निर्णय दिनांक ०४ मार्च, २०१४ मध्ये कर वसुलीची जबाबदारी फक्त ग्रामपंचायत कर्मचा-यांना न देता ग्रामसेवक, सरपंच व पदाधिकारी यांनीही ती करण्याबाबत सूचित केले आहे.

---

**इंदिरा आवास योजना व इतर घरकुल योजनेअंतर्गत प्रतिक्षा यादीत जास्त लाभार्थी असलेल्या गावातील बेघर व अत्यंत गरजू लोकांना घरकुलाचा लाभ मिळत नसल्याबाबत**

**(६) ४७१९ (२२-१२-२०१४). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रत्येक जिल्ह्यात घरकुल करिता प्रतिक्षा यादी तयार करुन कमी लाभार्थी असलेल्या गावांना प्रथम लाभ देण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जास्त लाभार्थी असलेल्या गावातील बेघर व अत्यंत गरजू लोकांना घरकुल योजनेचा लाभ देण्यात येतो, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, बेघर व अत्यंत गरजू असूनही गावात जास्त लाभार्थी संख्या असल्यामुळे बेघर व अत्यंत गरजू लोकांना घरकुलाचा लाभ मिळत नसल्यामुळे त्यांच्यावर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०२-२०१५) :**(१) होय.

(२) नाही.

(३) नाही.

शासन निणर्य क्र. इंआयो-२०१० /प्र.क्र.३४/ योजना -१०, दिनांक ९ एप्रिल, २०१० अन्वये योजनेचा दृष्टस्वरुपात परिणाम दिसण्यासाठी तसेच लाभधारकांना जलद गतीने घरकुले मंजूर करणे सुलभ व्हावे म्हणून सर्वात कमी कुटुंब दिनांक १.४.२०१० रोजी उरलेली आहेत. ती

ग्रामपंचायत प्रथम क्रमांकावर व त्यानंतर चढत्या क्रमाने (ascending order) ग्राम पंचायतीची यादी तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. कमी कुटुंब असलेल्या ग्रामपंचायतीमधील यादी संपुष्टात आल्यानंतर जास्त कुटुंब असलेल्या ग्रामपंचायतीना घरकुलांचा लाभ देता येईल.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**श्रीगोंदा (जि.अहमदनगर) पंचायत समितीने दारिद्र्य रेषेखालील नागरिक, अल्पभूधारक शेतकरी व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना साहित्य वाटप न केल्याबाबत**

**(७) १११६६ (०७-०४-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा पंचायत समिती दारिद्र्य रेषेखालील नागरिक अल्पभूधारक शेतकरी व शालेय विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या साहित्यांसाठी त्यांनी अर्ज करुनसुध्दा अद्यापही वाटप करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, कोणकोणत्या प्रकारचे साहित्य मिळण्याबाबत किती अर्ज प्राप्त झाले आहेत,

(४) असल्यास, वरील साहित्याचे दारिद्र्य रेषेखालील नागरिक, अल्पभूधारक शेतकरी व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना वाटप केव्हा करण्यांत येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :**(१) होय.

(२) व (३) एकूण ११ वस्तू खरेदीची मागणी असून ५६७ अर्ज मंजुरीसाठी पाठविले आहेत.

(४) लाभार्थ्यांच्या मंजूर याद्या अद्याप प्राप्त झालेल्या नाहीत. याद्या प्राप्त होताच साहित्य वाटप करण्याची दक्षता घेतली आहे.

---

**औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने बांधलेल्या १००० पुलांची अधिकृत नोंदणी झाली नसल्याबाबत**

**(८) ११३१३ (०६-०४-२०१५). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने बांधलेल्या तब्बल १००० पुलांची अजून अधिकृत नोंदणी झाली नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पूलावरुन वाहतूक सुरु करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यास जबाबदार असणा-या अधिकारी वा कर्मचा-यांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही. औरंगाबाद जिल्ह्यातील इतरजिल्हा मार्ग व ग्रामीण मार्गावरील एकूण १७५८ पुलांच्या नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.

(२) नोंद घेतलेल्या पुलावरुन वाहतूक सुरळीत चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ग्रामविकास विभागाच्या परिपत्रकानुसार जिल्हा पातळीवरील समुपदेशक व विधी सल्लागार यांना मिळत असलेल्या मानधनाबाबत होत असलेला गैरव्यवहार**

**(९) १६९६५ (१४-०८-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामविकास विभागाच्या दिनांक १४ जानेवारी, २०१४ रोजीच्या परिपत्रकानुसार जिल्हा पातळीवरील समुपदेशकास व विधी सल्लागारास दरमहा प्रत्येक १२ हजार रुपयापर्यंत मानधन तर तालुका पातळीवरील समुपदेशकास व विधी सल्लागारास दरमहा ९ हजार रुपयांचे मानधन देण्याच्या सूचना आहेत परंतू वास्तविक त्यांना किती मानधन मिळते यांचा तपशील नसल्याचे माहे मे, २०१५ वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त केंद्राना जिल्हा परिषद व पंचायत समितीमार्फत दूरध्वनीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी व इतर कार्यालयीन खर्चासाठी दरमहा १ हजार रुपये देण्यात यावे असे निर्देष देण्यात आले असूनसुध्दा बहुतांश समुपदेशन केंद्रात कागदोपत्री मेळ घालून व अधिका-यांशी संगनमत साधुन मानधन घेतले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-१०-२०१५) :**(१) व (२) हे खरे नाही.

जिल्हा पातळीवर /तालुका पातळीवरील समुपदेशक/विधी सल्लागारास मानधन जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाच्या सेस फंडातून दिले जाते. राज्यातील जिल्हा परिषदेतील उत्पन्नाचा सेस फंड हा सर्व जिल्हा परिषदेत कमी/अधिक प्रमाणात असल्याने त्याप्रमाणे जिल्हा पातळीवर/तालुका पातळीवरील समुपदेशक/विधी सल्लागारास कमी/अधिक प्रमाणात मानधन दिले जाते. तसेच समुपदेशक केंद्राकडून कार्यालयीन खर्चामधून भागविले जाते. तसेच समुपदेशक केंद्राकडून प्राप्त दुरध्वनी देयक जिल्हा परिषदेच्या कार्यालयीन खर्चामधून भागविले जाते. परंतु समुपदेशक केंद्राचा कागदोपत्री मेळ घालून, अधिकाऱ्यांशी संगनमत घालून मानधन घेतले जाते ही बाब अद्यापि, निदर्शनास आलेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**स्वामीत्व धन (रॉयल्टी) गेल्या १० वर्षांपासून जिल्हाधिकारी कार्यालयाकडून वाटप होत नसल्याबाबत**

**(१०) २२७७६ (१६-०८-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील ८ तालुक्यातील ग्रामपंचायतींना गौण खनिजा पोटी देय असणारे स्वामीत्व धन (रॉयल्टी) गेल्या १० वर्षांपासून जिल्हाधिकारी कार्यालयाकडून वाटप होत नसल्याने संबंधित ग्रामपंचायतींनी वेळोवेळी अर्ज विनंती द्वारे जिल्हाधिकारी कार्यालय पालघर येथे शासनाचे लक्ष वेधुनही रॉयल्टी मिळत नसल्याने स्थानिक लोकांनी ४ दिवसाचे बेमुदत उपोषण पालघर तहसिल कार्यालयासमोर सुरू केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बाबत संबंधित ग्रामपंचायतीने माहे डिसेंबर, २००४ पासून रॉयल्टी ग्रामपंचायतींना मिळावी म्हणून सातत्याने पत्रव्यवहार करुनही कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यातील तहसिल कार्यालयात गौण खनिज लेखा शिर्षकाखाली वसूल केलेल्या स्वामीत्व धन (रॉयल्टी) रकमेपैकी संबंधीत ग्रामपंचायतींना विकास कामाकरिता किती अनुदान प्राप्त झाले व त्याचे वाटप प्रत्यक्षात केव्हा करण्यात आले,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-१०-२०१५) :**(१) शासनाकडून गौण खनिजावरील स्वामित्वधनाच्या मिळकतीतून अभिहस्तांकित रकमा देण्यासाठी ग्रामपंचायतींना सहाय्य याखाली अनुदान देण्यात येते. मंजूर अनुदानाच्या प्रमाणात तत्कालिन जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांच्याकडून संबंधित तहसिल कार्यालय/ पंचायत समिती मार्फत ग्रामपंचायतींना अनुदानाचे वाटप करण्यात आलेले आहे.

गौण खनिज उत्खननाच्या स्वामित्वधनामधून संबंधित ग्रामपंचायतीला अनुदान मिळण्याबाबत श्री.भद्रेश, गागंजी शहा यांनी पालघर तहसिल कार्यालयासमोर उपोषण व धरणे आंदोलन केले होते.

(२) हे खरे नाही.

(३) ठाणे जिल्ह्याचे विभाजनपूर्वी जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांचे आदेशानुसार गौण खनिजांचे अनुदान ग्रामपंचायतींना वेळोवेळी त्या त्या पंचायत समिती मार्फत वाटप करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बेबंळा मुख्य कालवा, उपकालवा व वितरीकाकरिता भुसंपादीत केलेल्या जमीनीचा मोबदला मिळण्याबाबत**

**(११) २३४७२ (१७-०८-२०१५). प्रा.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाभुळगांव, कळंब, राळेगांव, जि.यवतमाळ बेबंळा मुख्य कालवा, उपकालवा व वितरीकाकरिता फार मोठ्या प्रमाणात जमीन भुसंपादीत केलेल्या आहे, त्यांना अद्यापही जमीनीचा मोबदला अदा करण्यात आलेला नाही असे दिनांक १ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किती जमीनीचा मोबदला अदा करण्यात आला व हा मोबदला नविन भुसंपादन कायद्यानुसार देण्यात आला आहे काय व नसल्यास का देण्यात आला नाही,
(३) असल्यास, या व्यतिरिक्त बेबंळा कालव्याकरीता भुसंपादनाची आवश्यकता असणार आहे काय ?

**श्री. गिरीष महाजन (३०-१०-२०१५) :**(१) नाही.
(२) बेंबळा प्रकल्पाच्या मुख्य कालवा व वितरण प्रणालीकरिता एकूण आवश्यक २५९० हे जमिनी पैकी मे २०१५ पर्यंत १९१० हेक्टर क्षेत्राचे अंतीम निवाडे जाहीर झाले आहेत. त्यानुसार भुधारकास रु. ३२.३८ कोटी मोबदला अदा करण्यात आलेला आहे. ९१ हे करिता नविन कायद्यानुसार अंतिम निवाडा झालेला असून ऑगस्ट, २०१५ अखेर निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. उर्वरित ५८९ हे. क्षेत्र हे भुसंपादनाची कार्यवाहीत प्रगतीपथावर आहे.
(३) सद्यस्थितीत बेंबळा प्रकल्पाचे कालव्याकरिता उपरोक्त प्रश्न क्र. २ मधील उत्तरात नमूद जमिनी व्यतिरिक्त जमिनीची आवश्यकता नाही.

---

**चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कजिर्णे पाटबंधारे प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(१२) २३९२८ (१४-०८-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गेल्या सोळा वर्षापासून चंदगड तालुक्यातील (जि.कोल्हापूर) कजिर्णे पाटबंधारे प्रकल्पाचे काम थांबले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ९ कोटी बजेट असलेल्या या प्रकल्पावर आतापर्यंत सुमारे ५२ कोटी खर्च होऊनही केवळ ६० टक्के काम पूर्ण झाले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पाचे काम अपूर्ण रहाण्याची कारणे काय आहेत व ती कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही. सदर प्रकल्पाचे काम मे २०११ पासून बंद आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
प्रकल्पाची मंजूर सुप्रमा किंमत रु.२२.२८ कोटी असून प्रकल्पावर माहे जुलै, २०१५ अखेर १९.७९ कोटी खर्च झाला आहे. धरणाचे सुमारे ८० % काम पूर्ण झाले आहे, तसेच ४ को.प.बंधारे पूर्ण झाले आहेत.

पाया खचल्याने मुख्य विमोचकात काही त्रुटी निर्माण झालेल्या आहेत. कार्जिणे लघु पाटबंधारे तलावाचे साठवण तलावात रुपांतर करुन तो पूर्ण करणे विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळात ३०० अभियंत्याची पदे रिक्त असल्याबाबत**

**(१३) २३९५७ (१७-०८-२०१५). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील सिंचन प्रकल्पाच्या कामाची अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने थेट सिंचन प्रकल्प मार्गी लावणे, कामास अडथळा निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,
(२) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत गोसीखुर्द, बेवडा, लोअरवर्धा या मोठ्या शेकडो छोट्या सिचंन प्रकल्पाची कामे जवळपास ३५० लहान प्रकल्पाची कामे गेल्या १० वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रलंबित कामाकरिता शासन धोरण निधीचा अभाव आणि विभागांतर्गत दिरंगाई हे कारणीभूत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत सिंचन प्रकल्पामध्ये रिक्त असलेल्या ३०० अधिकाऱ्यांची पदे भरण्यास शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-०९-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत अभियांत्रिकी संवर्गात एकूण २०४० पैकी ५३४ पदे ऑगस्ट, २०१५ अखेर रिक्त आहेत.
(२) व (३) या महामंडळांतर्गत १८ मोठे, ५१ मध्यम, २४३ लघु प्रकल्प असे एकूण ३१४ प्रकल्प आहेत. या प्रकल्पापैकी ९९ प्रकल्पांची कामे जवळपास पुर्ण झालेली आहे. ३१ प्रकल्पांना वनजमिनीची अडचण आहे. उर्वरीत प्रकल्पांना आर्थोपायाची स्थिती व मा.राज्यपालांचे निदेश यानुसार उपलब्ध निधीनुसार व भुसंपादन पुनर्वसन, वनजमिन, स्थानिक शेतकऱ्यांचा विरोध यांसह इतर अडचणी दूर करुन गती देण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्नशील आहे.
(४) विभागांतर्गत अभियांत्रिकी सेवेतील रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने वेळोवेळी आढवा घेण्यात येत असून सरळसेवा तसेच पदोन्नतीद्वारे रिक्त पदे भरण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. महसूली विभाग वाटप नियम, २०१५ नुसार सरळसेवेने व पदोन्नती नागपूर आणि अमरावती प्रादेशिक विभागात नियुक्तीसाठी उपलब्ध होणाऱ्या अभियंत्यांमधून विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर अंतर्गत रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही प्राधान्याने करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सफाळे, (ता.जि.पालघर) येथील कपासे ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील आदिवासींच्या जमिनीवर बेकायदेशीर बांधकामे करण्यात येत असल्याबाबत**

**(१४) २३९८२ (१४-०८-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सफाळे, (ता.जि.पालघर) येथील कपासे ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील आदिवासींच्या जमिनीवर बेकायदेशीर बांधकामे करण्यात येत असल्याची तक्रार तहसिलदाराकडे कपासे ग्रामपंचायतीचे सरपंच श्री.पागी यांनी केली आहे असे दिनांक ६ जून, २०१५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासींच्या जागेवर बांधलेले गाळे व चाळी या भागात कामानिमित्त परप्रांतातून आलेल्या कामगारांना दोन त अडीच लाख रुपयांना विकण्यात येत असल्याची ही तक्रार त्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०९-२०१५) :**(१) होय.

(२) नाही.

(३) सदरचे बांधकाम ग्रामपंचायत सफाळे मार्फत निष्कासित करण्यात आले आहे.

(४) अशी बाब नाही.

---

**डहाणू व तलासरी (जि.पालघर) तालुक्यातील इंदिरा आवास घरकुल योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(१५) २४००२ (१४-०८-२०१५). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू व तलासरी (जि.पालघर) तालुक्यातील इंदिरा आवास घरकुल योजनेत मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार होणे, लाभार्थ्यांकडून परस्पर रक्कम काढणे, अर्धवट व निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणे, प्रतीक्षा यादीप्रमाणे लाभ न देणे असे दिनांक ८ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधितांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-११-२०१५) :**(१) नाही.

मात्र, आमदार श्री.पास्कल धनारे यांनी तलासरी व डहाणू तालुक्यातील विविध ग्रामपंचायतीमध्ये इंदिरा आवास योजनेंतर्गत मोठया प्रमाणावर झालेल्या भ्रष्टाचारांची चौकशी करण्यासंदर्भात दि. २१.२.२०१५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांना निवेदन दिले आहे.

(२) होय.

आमदार श्री. पास्कल धनारे यांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने गट विकास अधिकारी, पंचायत समिती डहाणू व तलासरी यांचेमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

इंदिरा आवाय योजना सन २०१३-१४ या वित्तीय वर्षात डहाणू तालुक्यातील विवळवेढे ग्रामपंचायती अंतर्गत अवंढाणी पाडयातील ३२ लाभार्थ्यांकडून श्री.भिकू कृष्णा गिंभल, ग्रामपंचायत सदस्य, विवळवेढे यांनी रक्कम रु.२,१०,७००/- घेतल्याचे निदर्शनास आले आहे.

इंदिरा आवास योजना सन २०१३-१४ या वित्तीय वर्षात तलासरी तालुक्यातील वेवजी ग्रामपंचायती अंतर्गत श्री. अशोक माहया घाटाळ कर्मचारी ग्रामपंचायत वेवजी यांनी एकूण ४७ लाभर्थ्यांपैकी ४१ लाभार्थ्यांना अनुदान कमी दिल्याची व प्रती लाभार्थी रु.३५००/- इतकी रक्कम घेतल्याची बाब निदर्शनास आली आहे.

(३) श्री.भिकू कृष्णा गिंभल, ग्रामपंचायत सदस्य यांचेविरुध्द पोलिस स्टेशन कासा येथे दिनांक १६.७.२०१५ रोजी फौजदारी गुन्हा दाखल केला आहे. तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम १४(ग) नुसार ग्रामपंचायत सदस्यत्व रद्द करण्याचा प्रस्ताव तहसिलदार डहाणू यांचेकडे पाठविण्यात आला आहे.

श्री.अशोक माहया घाटाळ यांचे विरुध्द तक्रार प्राप्त झाल्यानंतर श्री.घाटाळ यांनी लाभार्थ्यांकडून घतलेले पैसे परत करण्यास तयार आहे, त्याबाबत माझी कोणतीही तक्रार नाही असे त्यांच्या खुलाशात नमूद केले आहे. यासंदर्भात ४७ लाभार्थ्यांनी घरकुलाचे पुर्ण अनुदान रु. ९३,५००/- प्राप्त झालेले लेखी जबाबत लिहून दिले आहे.

श्री.अशोक माहया घाटाळ ग्रामपंचायत कर्मचारी असल्याने त्यांना निलंबित करण्याच्या सूचना गट विकास अधिकारी यांचेमार्फत श्री.गुलाब लहानू गोधाले, ग्राम विकास अधिकारी यांना देण्यात आल्या. तथापि, श्री.गुलाब लहानू गोंधाले, ग्राम विकास अधिकारी यांनी दि.१३.४.२०१५ रोजी ग्रामपंचायतीची मासिक सभा घेऊन श्री.घाटाळ यांनी लाभार्थ्यांकडून पैसे घेतल्याचा ग्रामपंचायतीमध्ये कोणताही कागदोपत्री पुरावा नसल्याने तोंडी तक्रारीनुसार श्री.घाटाळ यांना निलंबित करुन नये असा ठराव घेण्यात आला. ग्राम विकास अधिकारी यांनी ग्रामपंचायतीचे सचिव म्हणून कोणत्याही प्रकारचे कायदेशीर मत अथवा मार्गदर्शन न केल्यामुळे श्री.गुलाब लहानू गोधाले, ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत वेवजी यांनी कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम, १९६७ मधील कलम ३ चा भंग केला म्हणून महाराष्ट्र जिलहा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम, १९६४ मधील कलम ४ (२) अन्वये श्री. गोंधाले यांची पुढील वेतनावर परिणाम न करणारी एक वेतनवाढ रोखण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यामध्ये पंचायत समिती हवेलीत घरकुल योजेनेत झालेला गैरव्यवहार

**(१६) २४२४१ (१४-०८-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हामध्ये पंचायत समिती हवेलीकडे घरकुलांसाठी २०१० ते २०१५ पर्यंतची प्रस्तावांची यादी सादर झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजुर यादीतील लाभार्थीबाबत कोणतीही चौकशी न करता अनेकांना घर पुर्णत्वाचे दाखले ग्रामसेवक तसेच अन्य शासकीय अधिकाऱ्यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेतील लाभार्थी गरजुंना या योजनेचा लाभ देण्याऐवजी सन २०१० पासून शासकीय अधिकाऱ्यांनी वशिलेबाजीचा अवलंब करीत ज्यांना गरज नाही, अशा व्यक्तींचे घरकुलांचे प्रस्ताव मंजुर केले आहेत,

(४) असल्यास, पुणे शहराच्या उपनगरीय भाग म्हणून हवेली तालुका ओळखला जातो, मात्र, या उपनगरीय भागात घरकुल योजनेतील गैरव्यवहार निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास,घरकुल योजनेबाबत पुर्व हवेलीतील गावांची पुर्ण चौकशी होण्याबाबत कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-११-२०१५) :**(१) होय.

ग्रामपंचायतीने तसार केलेल्या कायम प्रतिक्षा यादीमधूनच जिल्ह्यांना देण्यात आलेल्या उद्दिष्टांच्या प्रमाणात ग्रामपंचायतीना उद्दीष्ट देऊन लाभार्थ्यांना निवड करण्यात येते.

(२) नाही.

योजनेच्या निकषांप्रमाणे पात्र लाभार्थ्यांचे प्रस्ताव मंजूरीसाठी देण्यात येतात.

(३) नाही.

(४) नाही.

(५) ग्रामपंचायत हिंगणगांव येथील श्री. अ.वी.मालव, उप सरपंच, हिंगणगाव यांनी शासकीय योजनांची चौकशी होण्यासंदर्भात तक्रार अर्ज दि. १३.३. २०१५ रोजी दाखल केला होता. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत चौकशी केली असता सर्व पात्र लाभार्थ्यांनाच नियमानुसार लाभ देऊन अनुदान वितरीत करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगांव जिल्ह्यात ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवकाची पदे भरण्याबाबत

**(१७) २४२७० (१७-०८-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यात ११५१ ग्रामपंचायतीच्या कामाच्या अतिरिक्त भार ६८० ग्रामसेवकांवर टाकलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यात १५ तालुक्यात ग्रामपंचायतीसाठी ७७४ ग्रामसेवकांची पदे मंजूर आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ९४ पदे अनेक वर्षापासून रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अगोदर एकूण ग्रामपंचायतीच्या संख्येच्या तुलनेत ग्रामसेवकांची मंजूर पदाची संख्या कमी असतांना रिक्त पदामुळे ग्रामसेवकांवर जादा भार पडत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, यामुळे ग्रामस्थांच्या कामात अडथळे निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, ही रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०६-११-२०१५) :**(१) नाही.
(२) होय, जिल्ह्यातील १५ तालुक्यातील ग्रामपंचायतीसाठी ग्रामसेवकांची ७७४ व ग्रामविकास अधिकाऱ्यांची १६९ अशी एकुण ९४३ पदे मंजूर आहेत.
(३) नाही, ग्रामसेवकांची २९ पदे तसेच ग्रामविकास अधिकाऱ्यांची १६ पदे याप्रमाणे नुकतीच ४५ पदे रिक्त झालेली आहेत.
(४) रिक्त पदे भरेपर्यंत काही ग्रामसेवकांकडे हलका कारभार असलेल्या ग्रामपंचायतीचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे.
(५) नाही.
(६) सरळसेवा व पदोन्नतीद्वारे रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी पाटबंधारे उपविभागीय कार्यालय परिते (ता.करवीर) येथे स्थलांतर करण्याबाबत

**(१८) २४६८० (१४-०८-२०१५). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी धरण स्थापनेपासून कार्यरत असणारे राधानगरी येथील पाटबंधारे उपविभागीय कार्यालय परिते (ता.करवीर) येथे स्थलांतर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयामुळे राधानगरी धरणाच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, तदनुसार धरणाच्या सुरक्षितेच्या दृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५)** :(१) होय, शासन निर्णय क्र. आढावा २०१४/प्र.क्र.१७९/२०१४/आ.(प्रशि,) दि.२७.०५.२०१५ अन्वये भोगावती पाटबंधारे उपविभाग, राधानगरी या मुख्यालयात बदल करुन परिते, ता.करविर येथे स्थलांतरीत करण्यास मंजूरी देण्यात आली आहे.
(२) नाही, धरण स्थळावर राधानगरी पाटबंधारे शाखा कार्यरत आहे. या शाखेअंतर्गत राधानगरी धारणाच्या सुरक्षिततेचे काम अबाधित राहणार असून, त्यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**साकलेसा (जि.गोंदिया) तालुक्यातील देवाटीला धरणातील डाव्या व उजवा कालवा धरणासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना मिळण्याबाबत**

**(१९) २४८७० (१७-०८-२०१५). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया जिल्ह्यातील साकलेसा तालुक्यातील देवाटीला धरणात डाव्या व उजवा कालवा धरणासाठी शेतकऱ्यांची जमिन संपादीत करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांना सदर जमिनीचा मोबदला मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने शेतकऱ्यांना सदर जमिनीचा मोबदला मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५)** :(१) नाही.
तथापि, साकलेसा तालुक्यतील बेवारटोला प्रकल्पाकरीता खाजगी जमीप संपादीत केली आहे.
(२) बेवारटीला प्रकल्पाबाबत अंशत: खरे आहे. उक्त प्रकल्पास आवश्यक खाजगी जमीन एकूण १४५.९२ हे. क्षेत्रापैकी १४३.०२ हे क्षेत्राचा मोबदला देण्यात आला आहे. उर्वरित क्षेत्र २.९० हे करीता प्रकल्पाचे लघु कालव्यासाठी मौ. बंजारी २.४७६ हे. व मौ.धनेगाव ०.४२७ हे. करीता भुसंपादन कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) भुसंपादन कायदा १८९४ नुसार कार्यवाहीत असलेली प्रकरणे व्यपगत झाल्याने २.९० हे. जमीनीचे शासन निर्णय दि.१२.५.२०१५ नुसार सरळ खरेदीने संपादन करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील सूर्या प्रकल्पासाठी संपादीत केलेल्या जमिनीचा मोबदला शेतक-यांना मिळण्याबात**

**(२०) २४८९४ (१४-०८-२०१५). श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील सूर्या प्रकल्पासाठी शेतक-यांच्या जमीनी संपादीत करण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सूर्या प्रकल्पासाठी संपादीत केलेल्या शेतक-यांच्या जमीनीपैकी किती जमीनींचा अंतिम निवाडा घोषित होऊन किती शेतक-यांना मोबदला अदा करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या शेतक-यांच्या जमीनीचा मोबदला अजून पर्यंत देण्यात आलेला नाही त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत व त्यांना मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५)** :(१) होय.

(२) सुर्या प्रकल्पाच्या धरण व कालव्यासाठी संपादित करावयाच्या १९४४ हेक्टर खाजगी क्षेत्रापैकी १६६८.०७ हे. क्षेत्राचे अंतिम निवाडे घोषित झाले आहेत. त्याकरीता एकूण रक्कम रु. ४९१.६४ लक्ष महसुल खात्याकडे वर्ग केली असुन त्यापैकी रु. ३५७.१७ लक्ष रकमेचा मोबदला संबंधित शेतकऱ्यांना अदा करण्यात आला आहे.

(३) अंतिम निवाडा झालेल्या काही प्रस्तावातील रकमेचा मोबदला संबंधीत शेतकऱ्यांना अदा करणेची कार्यवाही उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) सुर्या प्रकल्प उहाणू या कार्यालयामार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे वारंगी (ता.महाड, जि.रायगड) येथे प्रकल्प बाधित**
**गांवाच्या पुनर्वसनास विलंब होत असल्याबाबत**

**(२१) २५०२२ (१७-०८-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वारंगी, (ता.महाड, जि.रायगड) येथे धरण बांधण्याचे काम गेले १० वर्षापासून चालू असून धरणाचे काम ८० टक्के पूर्ण झाले आहे परंतु अद्यापी नानोरे, गोंडाळे सहित इतर प्रकल्प बाधित गावांच्या पुनर्वसनाच्या कामाला सुरुवात झाली नसल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तसेच बाधित प्रल्पग्रस्तांना व शेतजमिनींना अद्यापी कोणतीही आर्थिक मदत नसून १६१२ कुटुंबाना प्रकल्पग्रस्त म्हणून दाखला देखील देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काळ जलविद्युत प्रकल्पग्रस्त बाधित असलेल्या लोकांच्या पुनर्वसनाबाबत शासनाने कार्यवाही करण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५) :**(१) हे अंशत: खरे आहे.

काळ जलविद्युत प्रकल्पाचे कामास एप्रिल, २००५ मध्ये सुरवात करण्यात आली असून आजतागायत घळभरणी वगळता धरणाचे काम ८० % पूर्ण झाले आहे.

बुडीत क्षेत्रातील बाधीत गावठाणांचे पुनर्वसन पाच गावठाणात करावयाचे नियोजित असून त्यापैकी निजामपूर (परडी) ८० टक्के, निजामपूर (घोसारी) ८० टक्के, सांदोशी (आढाव) ६० टक्के, वाघेरी ५० टक्के इ. पुनर्वसनाची कामे पूर्ण झालेली आहेत. नाणोरे पुनर्वसन गावठाणाच्या अंदाजपत्रकांना मंजूरी देणेबाबत कार्यवाही चालू आहे. गांडाळे पुनर्वसन गावठाण वगळण्यात आले आहे.

(२) प्रकल्पासाठी व पुनर्वसनासाठी केलेल्या भूसंपादनापोटी मोबदला अदा करणेसाठी महसूल विभागाकडे रु.२४.१४ कोटी जमा करण्यात आलेले आहेत व त्यातून वाटप करणेत येत आहे. प्रकल्पग्रस्तांना दाखले देणेची कार्यवाही महसूल विभागामार्फत होत आहे.

(३), (४) व (५) प्रकल्पग्रस्तांकडून पुनर्वसित गावठाणाची वारंवार जागा बदलल्यामुळे पुनर्वसनाची जागा निश्चित करण्यास विलंब झालेला आहे.

---

## पैठण तालुक्यातील आपेगाव व हिरडपूरी निन्म बंधाऱ्यासाठी गोदावरी नदीतून पाणी सोडण्यास होत असलेला विलंब

**(२२) २५१६७ (१७-०८-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण तालुक्यातील आपेगाव व हिरडपूरी निन्म बंधारे कोरडे पडले आहेत, त्यामुळे गोदाकाठच्या ४० गावांना पिण्याच्या सामना करावा लागत आहे, या बंधाऱ्यासाठी गोदावरी नदीत दोन वेळा पाणी सोडण्याचे ठरले असतानाही पाणी सोडण्यास विलंब होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील तीव्र पाणीटंचाई लक्षात घेता गोदावरीत नियमित पाणी सोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५) :**(१) नाही.

पाणी टंचाई लक्षात घेता मागणीनुसार व जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्या पाणी आरक्षण आदेशान्वये माहे नोव्हेंबर, २०१४, फेब्रुवारी, २०१५ व मे २०१५ मध्ये प्रत्येकी १५ दलघमी पाणी सोडण्यात आले आहे.

(२) उक्त बंधाऱ्यात कायमस्वरुपी जायकवाडी धरणातून पाणी सोडण्याची तरतूद नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## घाटंजी, आर्णि व पांढरकवडा या तालुक्यातील गावे जनसुविधे अंतर्गत समाविष्ट करणेबाबत

**(२३) २५२६६ (१७-०८-२०१५). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटंजी तालुक्यातील मांडवा, वगारा, इंजाळा, आर्णि तालुक्यातील राणी धानोरा, शिरपूर, बोदडी, चिखली तांडा, पिंपरी बोरी व पांढरकवडा तालुक्यातील मराठा वाकडी, टेभी इत्यादी गावे जनसुविधे अंतर्गत समाविष्ट करणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनधी (आर्णि) यांनी मा.पालकमंत्री, यवतमाळ जिल्हा यांना दिनांक १३ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-११-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) "ग्रामपंचायतीना जनसुविधांसाठी विशेष अनुदान" या योजनेंतर्गत कामे मंजूरीचे अधिकार जिल्हा नियोजन समितीकडे असल्याने सदर निवेदन जिल्हा नियोजन समितीकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्हयातील मौजे तालसवाडा-सिंचोल येथील रस्त्याची झालेली दुरवस्था

**(२४) २५४२६ (१४-०८-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील मौजे तालसवाडा-सिंचोल ग्रा.मा. ४ यातील २ किमी रस्त्याची दुरावस्था झाल्यामुळे दुचाकी, चारचाकी वाहनधारकांची व सर्व सामान्य नागरिकांची गैरसोय होत असल्यामुळे या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याची बाब  माहे जुन, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून या रस्त्याच्या बांधकामासाठी ४० लक्ष रुपये निधीची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त रस्त्याचे बांधकाम करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, बुलडाणा यांनी वेळोवेळी सुचित केले आहे, हे ही ख्रे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-१०-२०१५)** :(१) प्रश्नांकित रस्त्यांची तात्पुरती दुरुस्ती करण्यात आली असून सद्यस्थितीत सदर रस्त्यावर वाहतुक सुरळीत सुरु आहे.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधींनी मौखिक सूचना दिल्या आहेत.

(३) संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी २३६८९०.०४ कि.मी. असुन सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्याच्या लांबीच्या प्रमाणात करण्यात येते.

प्रश्नांकित मौजे तालसवाडा-चिंचोल रस्त्याची एकूण लांबी ४.०० कि.मी. आहे. त्यापैकी १.०० कि.मी. या लांबीतील मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम पुर्ण करण्यात आले असून उर्वरित लांबीचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील मौजे देवधाबा ते चिंचखेड जिल्हा सीमा हद्द रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(२५) २५४२८ (१४-०८-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील मौजे देवधाबा ते चिंचखेड जिल्हा सीमा हद्द रस्ता ग्रा.मा. ११ हया रस्त्याची दुरावस्था झाल्यामुळे दुचाकी, चारचाकी वाहनधारकांची व सर्व सामान्य नागरिकांची गैरसोय होत असल्याची बाब माहे जुन, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून या रस्त्याच्या बांधकामासाठी १२ लक्ष रुपये निधीची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त रस्त्याचे बांधकाम करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, बुलडाणा यांनी वेळोवेळी सुचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-१०-२०१५)** :(१) प्रश्नांकित रस्त्याची तात्पुरती दुरुस्ती करण्यात आली असून सद्यस्थितीत सदर रस्त्यावर वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(२) बांधकाम विभाग, जिल्हा परिषद बुलढाणाकडे अशा प्रकारचे निवेदन आढळून येत नाही.

(३) मलकापूर तालुक्यातील मौजे देवधाबा ते चिंचखेड जिल्हा सीमा रद्द हा रस्ता सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेनुसार ग्रामीण मार्ग क्र. ११ दर्जाचा असून या रस्त्याची लांबी ३.०० कि.मी. आहे. त्यापैकी २.४० कि.मी. चे डांबरीकरण झाले असून सदर लांबी सुस्थितीत आहे. उर्वरित ०.६०० कि.मी. लांबीच्या खडीकरण व डांबरीकरणाचे काम सन २०१५-१६ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत मंजूर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्ह्यातील दादगांव ते हिंगणा (ईसापूर) ता.नांदुरा रस्त्याची झालेली दुरवस्था

**(२६) २५४३१ (१७-०८-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील मौजे दादगांव ते हिंगणा (ईसापूर) ता.नांदुरा रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे या रस्त्यावरुन दुचाकी, चारचाकी वाहनधारकांना व सर्व सामान्य नागरीकांची गैरसोय होत असल्याची बाब माहे जुन, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असुन या रस्त्याच्या खडीकरण व मोरीच्या बांधकामासाठी ३० लक्ष रु. निधीची आवश्यकता आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याचे खडीकरण व मोरीचे बांधकाम करणे अत्यंत गरजेचे आहे, हे खरे आहे काय,
(३) उपरोक्त रस्त्याचे खडीकरण व मोरीचे बांधकाम करण्याबाबत स्थानिक लोक प्रतिनिधी यांनी मा.कार्यकारी अभियंता, जि.प.बां.विभाग, बुलढाणा यांना सुचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-१०-२०१५) :**(१) व (२) प्रश्नांकित भाग रस्त्याची तात्पुरती दुरुस्ती करण्यात आली असून सद्यस्थितीत सदर रस्त्यांवर वाहतूक सुरळीत सुरु आहे.
(३) जिल्हा परिषद बांधकाम विभाग बुलढाणा यांच्याकडे अशाप्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(४) मौजे दादगांव ते हिंगणा (ईसापूर) हा रस्ता सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेनुसार ग्रामीण मार्ग क्र. ४ दर्जाचा असून याची एकूण लांबी ७.०० कि.मी. आहे. प्रश्नांकित भाग रस्त्याची लांबी १.५० कि.मी असुन या भाग रस्त्याचे खडीकरण व मोरी बांधकामाचे काम सन २०१५-१६ या वर्षात जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत मंजुर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलडाणा जिल्ह्यातील मौजे निमागांव ते दादगांव ग्रा.मा. ९ ता.नांदुरा रस्त्याची झालेली दुरवस्था

**(२७) २५४३२ (१७-०८-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील मौजे निमागांव ते दादगांव ग्रा.मा. ९ ता.नांदुरा हा ३ किमी रस्ता नादुरुस्त असून या रस्त्यवरुनदुचाकी, चारचाकी, वाहनधारकांना व सर्व सामान्य नागरीकांची गैरसोय होत असल्याची बाब माहे जुन, २०१५

मध्ये निदर्शनास आली असून या रस्त्याच्या खडीकरण व डांबरीकरण बांधकामासाठी ५० लक्ष रुपये निधीची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची खडीकरण व डांबरीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) उपरोक्त रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. कार्यकारी अभियंता, जि.प.बांध. विभाग, बुलडाणा यांना वेळोवेळी सुचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-१०-२०१५)** :(१) व (२) प्रश्नांकित रस्त्याची तात्परुती रस्त्यांची तात्पुरती दुरुस्ती करण्यात आली असून सद्यस्थितीत सदर रस्त्यावर वाहतुक सुरळीत सुरु आहे.

(३) जिल्हा परिषद बांधकाम विभाग बुलडाणा यांच्याकडे अशाप्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(४) संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांचा अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांचर एकूण लांबी २३६८९०.०४ कि.मी.असून सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांच्या लांबीच्या प्रमाणात करण्यात येते.

प्रश्नांकित मौजे निमगांव ते दादागांव या रस्त्याचा एकूण लांबी ४.०० कि.मी. आहे. त्यापैकी २.०० कि.मी. लांबी सुस्थितीत आहे. उर्वरीत रस्त्यांच्या दुरुस्तीचे कामे जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषांच्या अधिन राहुन टप्या टप्याने करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलडाणा जिल्हयातील मौजे चांदुरबिस्वा-शिरसोड येथील रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(२८) २५४३८ (१४-०८-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्हयातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील मौजे चांदुरबिस्वा-शिरसोड ई.जि.मा. ४० ता.नांदुरा हा २.५ किमी रस्ता नादुरुस्त असून या रस्त्यावरुन दुचाकी, चारचाकी वाहनधारकांना व सर्व सामान्य नागरीकांना अशक्यप्राय झाले असल्याची बाब जून, २०१५ मध्ये निदर्शनास आली असून या रस्त्याच्या डांबरीकरणासाठी ५० लक्ष रुपये निधीची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे डांबरीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) उपरोक्त रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, जि.प.बां.विभाग, बुलढाणा यांना वेळोवेळी सुचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-१०-२०१५)** :(१) व (२) प्रश्नांकित भाग रस्त्याची तात्पूरती दुरुस्ती करण्यात आलेली असून सद्यस्थितीत सदर रस्त्यावर वाहतुक सुरळीत सुरु आहे.
(३) जिल्हा परिषद  बांधकाम विभाग बुलढाणा यांच्याकडे अशाप्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(४) संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्याची एकूण लांबी २३६८९०.०४ कि.मी. असून सदर रस्त्याच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्याच्या लांबीच्या प्रमाणात करण्यात येते.

प्रश्नाधिन रस्त्याचा दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून टप्प्या टप्प्याने करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दर्यापूर (जि.अमरावती) तालुक्यामध्ये चंद्रभागा बॅरेज, वाघाडी बॅरेज, सामदा व खेरकुंड तलावाचे कामे अर्धवट असून निधी अभावी बंद असल्याबाबत**

**(२९) २५५९९ (१४-०८-२०१५). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दर्यापूर (जि.अमरावती) तालुक्यामध्ये (१) चंद्रभागा बॅरेज (२) वाघाडी बॅरेज (३) सामदा व खेरकुंड तलावाचे कामे अर्धवट असून निधी अभावी बंद आहे, हे खरे आहे कय,
(२) असल्यास, निधी उपलब्ध करुन देण्यत बाबतची मागणी लोकप्रतिनिधीनी दिनांक १८ मार्च, २०१५ ला मा.जलसंपदा मंत्री यांचे कडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५)** :(१) नाही.

खेरकुंड प्रकल्पाचे काम पूर्ण झालेले असून उर्वरित प्रकल्पांची कामे सुधारित प्रशासकीय मान्यते अभावी बंद आहेत.
(२) होय.
(३) चंद्रभागा, वाघाडी व सागदा प्रकल्पास सन २०१५-१६ मध्ये मागील शिल्लक निधीसह अनुक्रमे रु.२६.९८ कोटी, रु.२९.५८ कोटी व रु.१४.५५ कोटी इतका निधी उपलब्ध आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्ह्यातील टेंभू उपसा सिंचन योजनेमध्ये खानापूर व आटपाडी तालुक्यातील वंचित गावांचा समावेश करण्याबाबत**

**(३०) २५६६९ (१४-०८-२०१५). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील टेंभू उपसा सिंचन योजनेमध्ये खानापूर व आटपाडी तालुक्यातील वंचित गावांचा समावेश करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी अधिक्षक अभियंता सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली यांचेकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५) :**(१) होय.

(२) व (३) टेंभू प्रकल्पांतर्गत लाभक्षेत्रामध्ये समाविष्ट करणेसाठी मा. विधानसभा सदस्यानी मागणी केलेल्या गावांची संख्या ४५ इतकी आहे. त्यापैकी १७ गावांचा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये समावेश झालेला आहे. प्रकलप लाभक्षेत्रातील उर्वरित २८ गावांबाबत क्षेत्रीय स्तरावर प्राथमिक सर्वेक्षण केले आहे. त्यानुसार टेंभू उपसा सिंचन योजनेचे नियोजन मंजूर पाणी नियोजनानुसार पूर्ण झाले आहे. तथापि, मा. विधानसभा सदस्यांनी मागणी केलेल्या आटपाडी व खानापूर तालुक्यातील काही वंचीत गावाचा टेंभू योजनेमध्ये समाविष्ट करणेसाठीचे प्राथमिक सर्वेक्षण केले आहे. परंतु प्रकल्पाचे प्रत्यक्ष नियोजनानुसार पाणी उपलब्ध नाही.

---

**कामठी (जि.नागपूर) तालुक्यातील पेंच प्रकल्पाच्या कालव्यातून पाणी झिरपण्याचे प्रमाण वाढत असल्याबाबत**

**(३१) २५८०१ (१७-०८-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामठी (जि.नागपूर) तालुक्यातील पेंच प्रकल्पाच्या कालव्यातून पाणी झिरपण्याचे प्रमाण वाढत असल्याचे माहे मे, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कालव्याच्या दुरुस्तीकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

मे महिन्यात कालव्यातून सिंचनासाठी पाणी सोडण्यात आले नाही. त्यामुळे कालव्यातून झिरपण्याची बाब निदर्शनास आली नाही.

तथापि, सन २०१४-१५ चे रब्बी हंगामातील सिंचनाचे वेळी शेवटच्या पाळीत, मार्च २०१५ मध्ये कामठी तालुक्यातील पेंच प्रकल्पाच्या उजव्या कालव्यावरील पुच्छ कालव्यातून पाझर होत असल्याचे निदर्शनास आले.

(२) पाझर कमी करण्याचे दृष्टीने पुच्छ कालव्याचे मातीकाम, अस्तरीकरण, बांधकामांची दुरुस्ती करणे इत्यादी कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यातील सीना-माढा जलसिंचन योजनेसाठी निधी मंजूर करण्याबाबत**

**(३२) २६२०२ (१७-०८-२०१५). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील सीना-माढा जलसिंचन योजनेसाठी १०० कोटीची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सिंचन योजना तातडीने पूर्ण व्हावी म्हणून तातडीने निधी मंजूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५) :**(१) प्रकल्प पूर्ण करण्यासाठी अंदाजे रु.२१० कोटींची आवश्यकता आहे.

(२) अर्थोपायाची स्थिती व मा. राज्यपालांचे निदेश यानुसार उपलब्ध होणाऱ्या निधीतून या याजनेची कामे पूर्ण करण्यात येत आहेत. सन २०१५-१६ मध्ये रु. ११ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पाली निरबाडे मुसाड रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३३) २६३१२ (१७-०८-२०१५). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पाली निरबाडे मुसाड रस्त्याचा पृष्ठभाग ठिकठिकाणी खराब झालेला असल्यामुळे वाहतुकीची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चिपळूण व खेड तालुक्यांतील काही गावांसाठी महत्वाचा असलेल्या सदर रस्त्याची सुधारणा व डांबरीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-१०-२०१५)** :(१) अंशत: खरे आहे.

(२) प्रश्नांकित रस्त्याचे नाव सन २००१-२०११ रस्ते विकास योजनेनुसार पाली निरभाडे मुसाड कुरवळजावळी रस्ता असे असून सदर रस्ता इतर जिल्हा मार्ग क्र. ४३ दर्जाचा आहे. या रस्त्यांची एकूण लांबी १५.३०० कि.मी. असून त्यापेकी ६/२०० कि.मी. लांबी खेड तालुक्यामध्ये व ९/०० कि.मी. ही लांबी खेड तालुक्यामध्ये येत असून या रस्त्यांचा संपूर्ण पृष्ठभाग डांबरी आहे.

प्रश्नांकित रस्त्याच्या १/६५० कि.मी. लांबीतील दुरुस्तीचे काम जिल्हा वार्षिक योजना सन २०१३-१४ व पुरहानी दुरुस्ती कार्यक्रम अंतर्गत सन २०१३-१५ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. सदर रस्त्याच्या एकूण लांबीपैकी ९/७१० कि.मी. लांबी सुस्थितीत आहे.

सदर रस्त्याच्या नादुरुस्त लांबीतील काम जिल्हा वार्षिक योजना आराखडा सन २०१५-१६ मध्ये जिल्हा परिषदेमार्फत प्रस्तावित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**प्राणहिता चेवेल्ला धरण प्रकल्पासाठी वर्धा-वैनगंगा नदीचा प्रवास वळविल्याबाबत**

**(३४) २६४११ (१७-०८-२०१५). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्राणाहिता चेवेल्ला धरण प्रकल्पासाठी महाराष्ट्रातील (जि.चंद्रपूर) वर्धा-वैनगंगा नदीचा प्रवाह वळविला जाणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पामुळे गोंडपीपरी तालुकयातील १२ गावे पाण्याखाली येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पामुळे नव्याने घोषीत झालेल्या अभयारण्यास या धरणाचा फटका बसणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात जल सुनावणी झाली आहे काय,

(५) असल्यास, यावर शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५)** :(१) होय. वर्धा पैनगंगा संगम स्थळी बंधारा बांधून तेलंगणा राज्याचे वाट्याचे पाणी तेलंगणा राज्यात वळविले जाणार आहे. महाराष्ट्राचे पाणी हक्कावर प्राणहिता चेवेल्ला प्रकल्पामुळे कोणतीही बाधा पोहचणार नाही. राज्याचे पाणी हक्क अबाधीत राहणार आहेत.

(२) नाही, प्रकल्पाच्या प्राथमिक अहवालाप्रमाणे चंद्रपूर जिल्ह्यातील २२ व गडचिरोली जिल्ह्यातील ८ गावांमधील नदी काठची जमीन बाधीत होणार आहे. मात्र एकही गावठाण बाधीत होणार नाही. सविस्तर सर्वक्षणानंतर व प्रकल्पाची पूर्ण संचय पातळी निश्चीत झाल्यानंतरच पुढील क्षेत्राची व्याप्ती निश्चीत होईल.

(३) नाही, राष्ट्रीय उध्याने व अभयारण्यावर विपरित परिणाम होणार नाही असे प्रकल्प अहवालात नमूद आहे. तथापि सदर बाब सखोल सर्वेक्षणानंतर व प्रकल्पाची पूर्ण संचय पातळी निश्चीत झाल्यानंतरच स्पष्ट होईल.
(४) नाही, सविस्तर सर्वेक्षणानंतर महाराष्ट्र राज्याचे सहमतीने प्रकल्पाची पूर्ण संचय पातळी निश्चीत झाल्यावर बुडीत क्षेत्राची व्याप्ती व इतर परिणाम निश्चीती नंतरच जनसुनावणी घेणे प्रस्तावित आहे.
(५) तेलंगणा राज्याकडून बुडीत क्षेत्राचे सर्वेक्षण प्रगतीत आहे. सर्वेक्षणाची तपासणी महाराष्ट्र राज्याकडून करण्यात येत आहे. संभाव्य बुडीत क्षेत्राजवळील गावाचे तलांक, महत्तम पूर पातळी इ. तपशील गोळा करण्याचे काम प्रगतीत आहे. प्रकल्पामुळे येणारा पाणी फुगवटा अभ्यास मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक मार्फत सुरु आहे. सविस्तर सर्वेक्षणानंतर महाराष्ट्रावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करुनच बॅरेजची पूर्ण संचय पातळी निश्चीत करणेत येणार आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्यातील मोर ओहोळ नाल्यावरील फये याठिकाणच्या लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या बंधा-यांच्या पाण्याची गळती रोखण्याबाबत**

**(३५) २६४८५ (१७-०८-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्यातील मोरओहोळ नाल्यावरील फये याठिकाणी ३३.५० मीटर उंची असलेल्या व १३९ दशलक्ष घनफुट पाणी असणा-या फसे लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या बंधा-यांना मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती लागल्याचे माहे मे, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाची गळती चिंताजनक असून याकडे संबंधित अधिका-यांचे दुर्लक्ष झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले व सदरहू गळती रोखण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
सदर गळती रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजनांचे रु.२७.३९ लक्ष किंमतीच्या कामांना माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये शासनाकडून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. निधीच्या उपलब्धते प्रमाणे उपरोक्त दुरुस्ती कामे करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाशिम जिल्हा परिषदेमध्ये शिलाई मशिनच्या वितरणाबाबत**

**(३६) २६५६४ (१७-०८-२०१५). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हा परिषदेच्या दिनांक १९ मे, २०१५ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत जिल्हा परिषद महिला बालकल्याण विभागामार्फत महिलांना रोजगार मिळावा म्हणून शिलाई मशिनचे वितरण करण्याचे आदेश संबंधित कंत्राटदारांना दिले असून सुध्दा त्यांनी त्याचा पुरवठा केला नसल्याने सदर कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्यासंदर्भातचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा अशी मागणी जिल्हा परिषद सदस्यांनी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्हा परिषद सदस्यांच्या मागणीनुसार संबधित कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्याची प्रक्रिया करण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनामार्फत शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे काय,

(३) नसल्यास, अद्यापही या प्रकरणी प्रस्ताव पाठविण्याच्या कारवाईमध्ये दिरंगाई होत असल्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-१०-२०१५) :**(१) होय.

(२) नाही.

संबंधित पुरवठाधारकांनी शासनाने जी विहित मुदत नमूद केली आहे त्या विहित मुदतीचा पुरवठा करणे शक्य नसल्याचे आधीच कळविल्याने कारवाई करण्यात आली नाही.

(३) नाही.

सन २०१४-१५ या जिल्हा परिषदेचा उपकर हा निधी व्यपगत होत नसल्याने सन २०१५-१६ मध्ये वळता करुन घेण्यात आलेला आहे. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरिता शिलाई मशीन खरेदी करण्याबाबत दिनांक १४/८/२०१५ रोजीच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये ठराव पारित करण्यात आला असून विभागाने ई-निविदाद्वारे शिलाई मशीन खरेदीची प्रक्रिया सुरु केली आहे व त्यानुसार कारवाई करण्यात येत आहे.

---

**विदर्भातील सिंचन महामंडळाकडे दोन हजार कोटी रुपये निधी वापराविना पडून असल्याबाबत**

**(३७) २६५९२ (१७-०८-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दुष्काळ आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र सुरू असून विदर्भ सिंचन महामंडळाकडे तब्बल दोन हजार कोटी रुपयांचा निधी पडून आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा निधी न वापरण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या प्रकल्पांना सुधारित मान्यता देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५) :**(१) व (२) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडे भूसंपादन, पुनर्वसन, शेतकऱ्यांचा विरोध, वनजमिन, वन्यजीव, सुधारीत प्रशासकीय मान्यता इत्यादी कारणांमुळे माहे ऑगस्ट, २०१५ अखेर रु.२६२५.७० कोटी निधी शिल्लक आहे.

(३) मे, २०१४ पासून विदर्भातील एकूण २८ प्रकल्पांना सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली आहे.

मा.राज्यपालांच्या निदेशनानुसार दि.९.९.२०१५ चे शासन निर्णयानुसार विदर्भ व मराठवाडयातील प्रकल्पांना सुप्रमा देण्याचे अधिकार संबंधित महामंडहळांना प्रदान केले आहेत.

---

**जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील भिवाडे खुर्द येथील रामजेवाडी पाझर तलावाच्या सांडव्याची अतिवृष्टीमुळे झालेली दुरवस्था**

**(३८) २६७०७ (१७-०८-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील भिवाडे खुर्द येथील रामजेवाडी पाझर तलावाच्या सांडव्यास गत वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे भेगा गेल्या असल्याचे माहे जून, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बंधा-या दुरुस्ती करीता भागातील ग्रामस्थांनी तहसीलदाराना निवेदन देऊन पावसाळ्यापूर्वी दुरुस्तीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५) :**(१) होय.

रामजेवाडी ल. पा. प्रकल्पाच्या ४० मी. लांबीची सांडव्याची दगडी भिंत क्षतीग्रस्त झालेली आहे.

(२) होय.

(३) निधीचे उपलब्धतेनुसार दुरुस्ती करण्याचे नियोजीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नरखेड (जि.नागपूर) तालुक्यात राबविण्यात येत असलेल्या पिंपळगांव लघुपाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(३९) २६९०४ (१७-०८-२०१५). डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरखेड (जि.नागपूर) तालुक्यात राबविण्यात येत असलेल्या पिंपळगांव लघुपाटबंधारे प्रकल्पाच्या कामास सन २००६ मध्ये सुरुवात होऊन केलेल्या रु.४८६०.६३ लक्ष इतक्या खर्चाच्या ९१५ हेक्टर सिंचन क्षमता असलेल्या पाटबंधारे प्रकल्पाचे रेल्वे क्रॉसिंग व रस्ता क्रॉसिंगचे बांधकाम पूर्ण न झाल्याने सन २०१५ पर्यंत ५६७ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण न झाल्यामुळे सदरहू प्रकल्प अद्यापी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित न झाल्याने वखाजी, कामठी, पारडी, येरला, पारसोडी व खारसोली या गावांतील शेतकरी सिंचनाच्या लाभापासून वंचित असल्याचे व सदरहू पूर्ण झालेल्या कालव्यातून गेल्या ३ वर्षापासून अद्यापी पाणी सोडलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकल्प अद्यापी पूर्ण न होण्याचे व सदरहू प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना सिंचनाकरीता पाणी उपलब्ध करून न देण्याची कारणे काय आहेत,
(४) सदरहू प्रकल्प तातडीने पूर्ण करण्यासाठी व प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे. सदर प्रकल्पाच्या कालव्याची एकूण लांबी ५.४९ कि.मी.असुन त्यापैकी सुरुवातीच्या ३.९ कि.मी. मध्ये सिंचनासाठी सोडले जाते.
(३) साखळी क्रमांक ३९०० मी. मधील कालव्यावरील रेल्वे क्रॉसिंगचे काम तसेच साखळी क्रमांक ३९६० मी. वरील रस्ता क्रॉसिंगचे काम अद्यापी पूर्ण झालेले नाही.
(४) उक्त कामाच्या निविदा स्वीकृती झाली आहे. कामे मार्च २०१६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारदरा धरण व पर्यटन परिसरात वीज देयक न भरल्यामुळे वीज पुरवठा वारंवार खंडित होत असल्याबाबत**

**(४०) २६९५२ (१७-०८-२०१५). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारदरा (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथील प्रवरा नदीवरील धरणाचे वीज देयकाची रक्कम शासनाने वेळेत न भरल्याने वीज पुरवठा खंडित केला जातो त्यामुळे धरण व परिसर देयक जमा होईपर्यंत अंधारात राहतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पर्यटन परिसरात वरील घटना वारंवार घडत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, भंडारदरा धरण व वीज महामंडळ शासनाचेच विभाग असतांना भंडादरा धरणास खाजगी ग्राहकाप्रमाणे वागणुक दिली जाते, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, धरण व पर्यटन परिसर अंधारत असणे ही बाब गंभीर आहे म्हणून वरील घटना वारंवार घडू नयेत यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (३०-१०-२०१५) :**(१) होय, चालू वर्षी जानेवारी २०१५ या महिन्यामध्ये विद्युत देयक मुदतीत न भरल्यामुळे भंडारदरा व परिसरातील विद्युत पुरवठा विद्युत वितरण कंपनीने दि. १४/०१/२०१५ पासून २०/०१/२०१५ या अल्प कालावधीसाठी खंडीत केला होता.

(२) वरील प्रमाणे विद्युत पुरवठा खंडीत होण्याच्या घटना यापुर्वी खालील कालावधीत घडलेल्या आहेत.

१) दि. १०/११/२०१० ते १३/११/२०१०
२) दि. २२/०१/२०११ ते २३/०१/२०११
३) दि. १६/०५/२०११ ते १९/०५/२०११
४) दि. ३१/०५/२०१३ ते ०६/०६/२०१३

(३) जलसंपदा विभाग व महावितरण कंपनी हे दोन्ही शासनाचेच विभाग असल्यामुळे भंडारदरा धरणास खाजगी ग्राहकाप्रमाणे वागणूक देणे योग्य नाही, शासनाच्या दोन्ही विभागामध्ये समन्वय साधुन धरण परिसरात विद्युत पुरवठा पुन्हा खंडीत होणार नाही याप्रमाणे दक्षता घेण्याच्या सुचना क्षेत्रिय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहे.

(४) धरण परिसरात विद्युत पुरवठा खंडीत होण्याची घटना भविष्यात घडु नये, यासाठी विद्युत देयके वेळेत अदा करण्याबाबत दक्षता घेण्याच्या सुचना क्षेत्रिय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

---

**इंदिरा आवास घरदुरुस्ती योजनेतंर्गत घर दुरुस्ती करण्यात आलेल्या लाभार्थ्याला नवीन इंदीरा आवास घरकुल योजनेचा लाभ मिळण्याबाबत**

**(४१) २७०४७ (१७-०८-२०१५). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन २००१-०२ मध्ये इंदिरा आवास घरदुरुस्ती योजना राबविण्यात आली होती, या योजनेतंर्गत लाभार्थ्यांना रुपये १० हजार घर दुरुस्तीसाठी देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेतील लाभार्थींनी घरदुरुस्ती योजनेचा लाभ घेतल्यामुळे इंदीरा आवास योजनेच्या नवीन घरकुल योजनेस पात्र होत नाहीत परिणामी रुपये १० हजार दुरुस्तीसाठी उचलेल्या रक्कमेमुळे लाभार्थी सदर योजनेपासून वंचित रहात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन याबाबतीत उपाययोजना करणार काय दुरुस्ती करण्यात आलेल्या लाभार्थ्याला नवीन इंदीरा आवास घरकुल योजनेचा लाभ देणार काय,

(४) असल्यास, याबाबतीत शासनाचे धोरण काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०९-२०१५) :**(१) होय.

(२) होय.

इंदिरा आवास योजनेअंतर्गत नवीन घरकुलाचा लाभ देण्यासाठी पात्र घरकुल लाभार्थ्यांची असलेली मोठी संख्या विचारात घेऊन "घरकूल दुरुस्तीचा लाभ" व "नवीन घरकुलाचा लाभ" असे दोनही लाभ घेऊ नये म्ळणून दि.०८.०९.२००९ रोजीच्या परिपत्रकान्वये "एखाद्या लाभार्थ्याने घर दुरुस्तीचा लाभ घेतल्यास त्यास नवीन घरकुलाचा लाभ देता येणार नाही" अशा स्वरुपाच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) व (४) नाही.

इंदिरा आवास योजनेच्या जून, २०१३ च्या मार्गदर्शन तत्वातील परिच्छेद ३.२.२ मध्ये घरकूल दुरुस्ती संदर्भात सूचना दिलेल्या आहेत. धोरण ठरविण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील धारणी, धारणी-मांडवा रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४२) २७०८० (१७-०८-२०१५). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील धारणी, धारणी-मांडवा रस्त्याला जागोजागी खड्डे पडल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा रस्ता मोठा प्रमाणात खराब झाल्यामुळे कोणतीच वाहतुक येथून होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत सार्वजनिक बांधकाम व जिल्हा परिषदेने रस्ता दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सद्यःस्थितीत या रस्त्यावर वाहतूक सुरु आहे.

(३) प्रश्नाधिन रस्त्याच्या पृष्ठभागावरील खड्डे भरणे हे काम योजनेत्तर (३०५४-२४१९) रस्ते व पुल दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत सन २०१५-१६ मधून मंजूर करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पारोळा (जि.जळगांव) तालुक्यातील करमाड (खुर्द) व ढोली या गावांमध्ये एमआरईजीएस ची कामे मंजूर करण्याबाबत**

**(४३) २७२८६ (१७-०८-२०१५). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारोळा (जि.जळगांव) तालुक्यातील करमाड (खुर्द) व ढोली या गावांमध्ये एमआरईजीएस ची कामे सन २०१४-१५ यावर्षामध्ये मंजूर करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दोन्ही गावात प्रत्येकी किती व कोणकोणती कामे घेण्यात आली होती व त्यापैकी प्रत्यक्षात किती खर्च झाला आहे,

(३) सदरची कामे मजुरांच्या नावावर दाखवून ग्रामपंचायतीचे सरपंच व अधिकारी यांनी संगनमताने कामे केल्याचे, बनावट नोंदी करुन लाखो रुपयांचा अपहार केला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१०-२०१५) :**(१) होय.

(२) पारोळा तालुक्यातील करमाड (खुर्द) व ढोली या गावात एमआरईजीएस अंतर्गत मंजूर झालेली कामे व त्यावर झालेला खर्च खालीलप्रमाणे आहे.

| **करमाड (खुर्द)** | |
|---|---|
| मंजूर कामाचे नाव | झालेला खर्च (रु. लाखात) |
| युवराज गोविंदा पाटील ते दिलीप देवचंद्र पाटील शेतरस्ता | रु.१२,८३,१४२ |
| भावराव नागो ते कृष्णा ताराचंद शेतरस्ता | रु.९,००,६१२ |
| आबा विश्राम पाटील ते पुंडलीक गोविंदा पाटील शेतरस्ता | रु.१०,३६,९७२ |
| शांताराम जयराम पाटील ते वंदना चैत्राम शेतरस्ता | रु.९,००,००४ |
| किशोर पाटील ते सुरेश पाटील शेतरस्ता | रु.१,९४,७०४ |
| श्रावण रामा ते शेरा राजाराम पाटील शेतरस्ता | रु.९४,६०० |
| सुनिल नागराज ते सरदार बापू शेतरस्ता | रु.४३,००० |
| वैयक्तिक शौचालय १० शिट | रु.५४,००० |
| पाझर तलावातील गाळ काढणे | रु.१,१६,८९२ |
| करमाड खुर्द ते म्हसोबा नाला रस्ता | रु.१,२४,२३१ |
| वैयक्तिक विहिर-बबन रामदास पाटील | रु.९७,६६३ |
| वैयक्तिक विहिर-राजेंद्र साहेबराव पाटील | रु.९७,६६३ |
| **ढोली** | |
| ढोली ते जुनी वॉटर सप्लायकडे जाणार शेतरस्ता | रु.९,२२,३९० |
| ढोली ते कराडी रस्ता | रु.१०,१४,४०८ |
| ढोली ते नविन वॉटर सप्लायकडे जाणारा शेतरस्ता | रु.१६,७०,४९८ |
| ढोली ते नविन शेताकडे जाणारा रस्ता | रु.१७,२०,६४५ |
| ढोली ते शेतशिवार रस्ता | रु.१,९८,८०० |
| वैयक्तिक शौचालय १२ शिट | रु.६४,८०० |

(३) व (४) नाही.

ग्रामपंचायत रस्तावर मजुरांचे मागणीनुसार झालेल्या कामाची तांत्रिक अधिकारी यांचेमार्फत मुल्यांकन करुन मजूरांची मजूरी पोस्ट खात्यात जमा केलेली आहे. तसेच कामाची मजुरी मजुरांनाच देण्यात आलेली आहे व याबाबत कोणत्याही मजुराची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे नायगांव खु. (ता.चिखली, जि.बुलडाणा) या गावात स्वतंत्र ग्रामपंचायत करण्याबाबत**

**(४४) २७३०४ (१७-०८-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नायगांव खु. (ता.चिखली, जि.बुलडाणा) या गावचे पेनटाकळी प्रकल्पामुळे अशंत: पुनर्वसन झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) मौजे नायंगाव खु. व डोंगरगाव ता.चिखली जि.बुलडाणा या गावाची गट ग्रामपंचायत असून दोन्ही गावामधील अंतर २२ कि.मी. आहे तसेच शासन निर्णयानुसार पुनर्वसित गावांची लोकसंख्या केवळ ३५० असेल तरी स्वतंत्र ग्रामपंचायत करता येतो त्यानुसार स्वतंत्र ग्रामपंचायत होणेसाठी नायगाव खु. या गावाचा प्रस्ताव आयुक्त अमरावती यांच्याकडून शासनाकडे दिनांक २४ मे, २०१५ रोजी पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्या येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०९-२०१५) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) शासन अधिसूचना दिनांक ०१ ऑगस्ट, २०१५ अन्वये ग्रामपंचायत डोंगरगाव, ता.चिखली, जि.बुलढाणा चे विभाजन करुन नावगांव खुर्द येथे स्वतंत्र ग्रामपंचायत निर्माण करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्याच्या जलविद्‌युत विभागाचे २६ वीज प्रकल्पांचे**
**नुतनीकरण करुन त्यांची क्षमता वाढविण्याबाबत**

**(४५) २७४२४ (१०-०८-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या जलविद्‌युत विभागाचे २६ वीज प्रकल्प महानिर्मिती वीज कंपनीच्या ताब्यात असून त्याच्या बदल्यात भाडेपट्टीच्या माध्यमातून शासनाला महसूल मिळत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वीज प्रकल्पांची मुदत संपली असल्याने उभारणीचा खर्च वसूल झाल्याचे कबूल करुन वीज नियामक आयोगाने भाडे वसूल न करण्याचे निर्देश दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याची विजेची वाढती मागणी लक्षात घेता जुन्या जलविद्‌युत प्रकल्पांचे नुतनीकरण करुन त्यांची क्षमता वाढविण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. २६ जलविद्युत प्रकल्पापैकी ५ जलविद्युत प्रकल्पांचे संकल्पित आयुर्मान पुर्ण झाले असूल या प्रकल्पांची भाडेपट्टी पुर्णपणे वसुल झाली असल्याने सदर प्रकल्पांची भाडेपट्टी मिळत नाही. तथापि, उर्वरित २० जलविद्युत प्रकल्पाची भाडेपट्टी महानिर्मिती कंपनीकडून मिळत आहे.

(३) व (४) संकल्पित आयुर्मान संपलेल्या जलविद्युत प्रकल्पांच्या कार्यक्षमतेचे पुर्नविलोकन करुन आवश्यकतेनुसार नुतनीकरण व आधुनिकीकरण करण्याचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम सुरु आहे.

---

**पाथरवाला (बु||) (ता.अंबड, जि.जालना) येथील गोदावरी नदीवरील बॅरेजेसचे काम अत्यंत संथगतीने सुरु असल्याबाबत**

**(४६) २७४८५ (१७-०८-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरवाला (बु||) (ता.अंबड, जि.जालना) येथील गोदावरी नदीवरील बॅरेजेसचे काम अत्यंत संथगतीने सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे बॅरेजेसच्या कामाचा खर्चही वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गोदावरी बॅरेजेसचे काम पूर्ण क्षमतेने होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) भाववाढीच्या अनुषंगाने कामाच्या खर्चात वाढ होत आहे.

(३) गोदावरी या मोठया नदीवरील सदर बंधाऱ्यांची सुरक्षितता व सुरळीत कार्यान्वयनाच्या दृष्टीने को.प. बंधाऱ्याचे बॅरेजमध्ये रुपांतरण (नुतनीकरण) कामासाठी मध्यवर्ती संकलप चित्र संघटना, नाशिक यांचे मार्फत सर्वसाधारण आराखडा व सविस्तर संकल्पनाची कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना जिल्हयातील मौजे हातवन बृ.ल.पा.प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(४७) २७४९१ (१७-०८-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयातील मौजे हातवन बृ.ल.पा.प्रकल्पाचे काम निधी अभावी बंद आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर प्रकल्पासाठी निधी उभारुन प्रकल्पाचे काम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५) :**(१) होय.
(२) व (३) होय, सन २०१५-१६ मध्ये या प्रकल्पासाठी रु. ४.४६ कोटी निधी मंजुर आहे. नवीन भुसंपादन कायदा २०१३ नुसार मावेजा देण्याची शेतकऱ्यांची मागणी आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मसुरे (ता.मालवण,जि.सिंधुदुर्ग) गाव डोंगराळ भागात असून**
**या गावात रस्त्याची सोय करण्याबाबत**

**(४८) २७५०३ (१७-०८-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मसुरे (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) गाव डोंगराळ भागात असून या गावात रस्त्याची सोय नसल्यामुळे ग्रामस्थांनी संबंधित विभागाकडे वारंवार मागणी करण्यात येवूनही अद्यापी सदरहू गावात रस्ता नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू गावात रस्ता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही. मसुरे हे गाव २ प्रमुख जिल्हा मार्गांनी जोडलेले असून सदर दोन्ही रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत आहेत.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सुकळी-बोथा रस्त्याच्या कामात गैरप्रकार झाल्याबाबत**

**(४९) २७७०४ (१७-०८-२०१५). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुकळी-बोथा रस्त्याची सुधारणा करणे या कामाकरीता जि.प.बांधकाम विभाग क्र.२ अंतर्गत श्री संतोष माणिकराव चव्हाण या कंत्राटदारास विठ्ठळ येथील खदानीवरुन २० कि.मी. चे अंतर देण्यात आले आणि याच खदानी वरुन अध्यक्ष मिलींद भ.का.स.संस्था मर्या.जवळ ता.आर्णी या संस्थेस याच कौरीवरुन याच कामासाठी ३८ कि.मी.चे अंतर देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) वरुड बीबी जाडे रस्त्यांचे खडीकरण व डांबरीकरण जि.प.बांधकाम विभाग क्र.२ अंतर्गत करतांना अरुण मनवर या शासकीय कंत्राटदारास विठ्ठल येथील खदाणी वरुन १६ कि.मी. चे अंतर कार्टींग म्हणून देण्यात आले अध्यक्ष रेणूका म.स.संस्था म.मोहदरी या संस्थेस मात्र सदर कामास विठ्ठल कौरी वरुण ३६ कि.मी.चे कार्टींग देण्यात आले आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-१०-२०१५)** :(१) सुकळी बौथा रस्त्यावर मोऱ्या बांधकाम करणे या कामासाठी सन २०११-१२ मध्ये गिट्टी व मुरुम या साहित्यासाठी विठ्ठळ खदान दर्शविण्यात आली असून, साहित्य वाहतुकीचे अंतर २० कि.मी. घेण्यात आले होते. त्यानंतर सन २०१३-१४ मध्ये सुकळी येथे अंतर्गत डांबरी रस्त्याच्या कामासाठी सुकळी लगत असलेल्या रपट्याचे पोचमार्ग क्षतीग्रस्त असल्याने सुकळी मरसुळ उमरखेड चि.वड्ळ या मार्गाने साहित्याची वाहतुक करावी लागत असल्याने साहित्य वाहतुकीचे अंतर ३० कि.मी. घेण्यात आले होते.
(२) वरुड बीबी रस्त्याची सुधारणा करणे या कामासाठी सन २०१२-१३ मध्ये साहित्यासाठी विठ्ठळ खदानीचे अंतर १८.०० कि.मी दर्शविण्यात आले होते. सन २०१३-१४ मध्ये या रस्त्याच्या सुधारणा करण्याच्या कामासाठी उमरखेड रस्त्याच्या जवळील रपट्याचे ॲप्रोचेस क्षतीग्रस्त असल्याने साहित्य वाहतुक ही मालेगाव लिंबगव्हाण विठ्ठळ मार्गाने करण्यात येत असल्यामुळे वाहतुकीचे अंतर २९ कि.मी. घेण्यात आले होते.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वर्धा जिल्हा परिषदेमध्ये सेस फंडातून अविकसीत भागांच्या विकासाबाबत**

**(५०) २७७७० (१७-०८-२०१५). श्री.रणजित कांबळे (देवळी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्हा परिषदेमध्ये सेस फंडातून अविकसीत भागांचा विकास यावर सर्वसाधारण सभेत जवळपास १ कोटीची तरतूद केली आहे, त्याचे कुठलेही नियोजन न करता, आराखडा तयार न करता व टेंडर न करता २ ते ३ जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांच्या मर्जीने कामे वाटप करुन कामे सुरु करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-१०-२०१५)** :(१) हे खरे नाही.
अविकसीत भागांचा विकास करणे या लेखाशिर्षाखाली जिल्हा परिषदेच्या रोरा फंडातून रु.८० लक्षची तरतूद जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत ठरावान्वये सर्वानुमते मंजूर करण्यात आली आहे.

सदर कामाचे नियोजन सर्वसाधारण सभेमार्फत करण्यात आले असून संबंधित कामे ग्रामपंचायतीला शासन निर्णय दिनांक २५/३/२०१५ नुसार करारनाम्यांद्वारे कार्यान्विम करण्यात आली आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.